# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** कर्जत
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0355 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/07/2026 01:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 10/07/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/07/2026
**Time From (वेळेपासून):** 14:04 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:49 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/07/2026 **Time (वेळ):** 00:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 001
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/07/2026 00:39 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सहाय्यक निबंधक कार्यालय ,कर्जत

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अजित बाळकष्ण त्रिपुटे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1976

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर,कर्जत,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर,कर्जत,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8329701344

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मिलींद प्रल्हादराव राऊत | | | 1. वेदांत हाईटस,,भांडेवाडी कर्जत,, ता कर्जत,कर्जत, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 10000/ रुपये रोख त्यात 500 | 10,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | रुपये दराच्या 20 नोटा. | |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 10/07/2026

मी अजित बाळकृष्ण त्रिपुटे, वय 50 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं. 8329701344.

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस उपअधीक्षक या पदावर दि. 27/08/2024 रोजी पासुन कार्यरत आहे. दि. 09/07/2026 रोजी आम्हास तक्रारदार यांनी समक्ष भेटुन त्यांची लोकसेवका विरोधात लाच मागणीची तक्रार असल्याचे कळवुन ते लोकसेवक यांना दि. 10/07/2026 रोजी माझे कामानिमीत्त भेटणार असल्याचे सांगितले. आम्ही तक्रारदार यांना दि. 10/07/2026 रोजी 12/00 वा. दरम्यान कर्जत येथील सुरक्षित ठिकाणी हजर राहणेबाबत सुचना दिली. त्यानंतर दिनांक 10/07/2026 आम्ही कार्यालयात हजर असलेले पोहेकाॅ शिंदे, पोकाॅ कराड, पोकाॅ सुपेकर, चापोहेकाॅ हारूण शेख यांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन, आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवष्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन पंच साक्षीदार मिरजगाव येथुन उपलब्ध करुन घेणार असल्याची माहिती देवुन, आम्ही सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिशी शासकिय वाहन क्र. एमएच 16 सीव्ही 0919 या वाहनाने ला.प्र.वि.कार्यालयातुन 10/15 वा. निघुन मिरजगाव येथे आलो.

त्यानंतर आम्ही मा. उप अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्या., मिरजगाव कक्ष, यांना पत्र देवुन दोन पंच उपलब्ध करून घेतले‍ॆ, आम्ही पंचाना एका तक्रारदार यांची लोकसेवकाविरूध्द लाचमागणीची तक्रार असुन त्याप्रमाणे कारवाई करायची आहे, सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. त्यांनतर मिरजगाव येथुन निघुन कर्जत येथील सुरक्षीत ठिकाणी 12/00 वा. पोहोचलो. त्या ठिकाणी तक्रारदार त्यांचेकडील बोलोरो वाहन क्र. एम एच 16 सीक्यु 7914 या वाहनासह हजर होते. आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता, तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव योगेश व्यंकटराव जामदार, वय 41 वर्षे, धंदा नोकरी सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, मर्या. रुईगव्हाण, रा. रुईगव्हाण, ता. कर्जत, जि.अहिल्यानगर असे सांगुन त्यांची तक्रार सांगितली की, मी वरील ठिकाणचा रहिवासी असुन रुईगव्हाण वि.का.सोसायटीचा सन 2016 पासुन सचिव म्हणुन काम पाहत आहे. आमच्या वि.का.सोसायटीच्या एकुण तेरा संचालक आहेत. सध्या जिल्हा बँक अहिल्यानगर संचालक मंडळाची निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचे काम चालु आहे. सदर निवडणुकीकरीता आमच्या वि.का. सोसायटीमधुन एक सभासदास निवडणुकी करीता मत देण्याचा अधिकार प्राप्त होतो. त्याकरीता आमच्या वि. का. सोसायटीची दि. 27/06/2026 रोजी मिटिंग बोलवली होती. त्या मिटिंगला 13 सदस्य हजर होते. सदर मिटिंग मध्ये श्री. नरसिंग श्रीधर पवार यांना मत देण्याचा अधिकार 12 संचालकांनी ठराव मंजुर केला होता. त्यातील संदिप मानसिंग जामदार हे मिटिंगला हजर राहुन सुध्दा त्यांनी प्रोसडिंगवर सही केली नाही. सदर प्रोसडिंग, ठराव व कागदपत्रे हे सहाय्यक निबंधक, कार्यालय कर्जत यांचेकडे जमा करण्यापुर्वीच श्री. संदिप जामदार यांनी दि. 29/06/2026 रोजी ठराव रद्द करणे बाबत लेखी अर्ज सहाय्यक निंबधक, कर्जत यांचेकडे केला व सदर तक्रारीवर सहाय्यक निबंधक कार्यालय कर्जत यांचेकडुन सचिव, रुईगव्हाण वि.का.से.सह.सोसा. मर्या.यांना खुलासा सादर करणे बाबत दि. 01/07/2026 रोजी पत्र प्राप्त झाले. त्याबाबत मी खुलासा, प्रोसडिंग व ठराव इ. कागदपत्रे दि. 02/07/2026 रोजी सहायक निंबधक कार्यलय कर्जत येथे जमा केले आहे. त्यावेळी श्री. राऊत सहाय्यक

निबंधक यांनी मला "तुमच काम खुप मोठे आहे, तुम्हाला मला 25,000/- रुपये दयावे लागतील तरच तुमचा अर्ज निकाली निघेल" असे म्हणुन माझेकडे पैशाची मागणी केली होती त्यावेळी मी त्यांना काहीच बोललो नाही. त्यानंतर दि. 08/07/2026 रोजी मी सहाय्यक निबंधक कार्यालय कर्जत येथे गेलो होतो त्यावेळी श्री. राऊत यांनी पुन्हा तुमच्या विरुध्द तक्रारी अर्जाचे मोठे काम होते, तुमच्या विरुध्दचा तक्रारी अर्ज निकाली काढला आहे असे बोलुन पुन्हा त्यांनी काम केल्याच्या बदल्यात 25000/- रुपयांची मागणी केली त्यावेळी मी त्यांना काही बोललो नाही.

त्यानंतर दि.09/07/2026 रोजी सकाळी श्री. राऊत यांनी मला मोबाईल फोन करुन त्यांनी श्रीगोंदा येथे चाललो आहे पिर फाटयावर या असे सांगितले. मी पिर फाटयावर जावुन त्यांची भेट घेतली असता तेथे त्यांनी तक्रारी अर्ज निकाली काढल्याच्या बदल्यात पुन्हा पैशाची मागणी केली होती, त्यावेळी मी त्यांना नाईलाजास्तव माझेकडिल 10,000/- रुपये दिले. त्यावेळी त्यांनी 25000/- रुपयापैकी राहिलेले 15,000/- रुपये अजुन दयावे लागतील व उदया नक्की ऑफिसला 15,000/- रुपये घेवुन मला भेटा असे म्हणाले, तेव्हा माझ्या लक्षात आले की, श्री. राऊत हे माझेकडे 25000/- रुपयापैकी राहिलेले अजुन 15,000/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत. सचिव सोसायटी विरुध्द दिलेल्या तक्रारी अर्जाचे प्रकरण निकाली काढण्यासाठी पैसे लागत नाहीत हे मला माहित आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही.

तरी मी आज दि.10/07/2026 रोजी श्री. राऊत यांची भेट घेणार आहे. सदर चर्चे दरम्यान अर्ज निकाली काढल्याचे बदल्यात त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कारवाई करावी. अशी तक्रार सांगितली. आम्ही तक्रारदार यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारीवर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार श्री. जामदार यांचे तक्रारी प्रमाणे लोकसेवक श्री. राऊत यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाॅईस रेकाॅर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवुन त्याच्या वापराबाबत तक्रारदार श्री. जामदार यांना व दोन्ही पंचांना माहिती समजावुन सांगितली. आमचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील पोकाॅ कराड यांनी व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकाॅर्ड नसल्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर पोकाॅ कराड यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून आमचे, दोन्ही पंच, तक्रारदार असे उपस्थित असलेबाबत निवेदन रेकाॅर्ड केले. त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तक्रारदार व पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. पोकाॅ कराड यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून ते तक्रारदार श्री. जामदार यांचे गळयात कोणास दिसणार अशा प्रकारे अडकवुन दिला. आम्ही दिल्या सुचने प्रमाणे तक्रारदार व पंच नं. 1 असे तक्रारदार जामदार त्यांच्या बोलोरो वाहनाने लोकसेवक राऊत यांची भेट घेण्याकरीता सहाय्यक निबंधक कार्यालय कर्जत येथे 13/05 वाजता रवाना केले. त्यानंतर 13/40 वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. 1 आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. पोकाॅ कराड यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. 1 यांना लोकसेवक राऊत यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विषयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे रवाना होउन सहाय्यक निबंधक कार्यालय कर्जत येथे पोहोचलो. तेथे श्री. राऊत हजर नव्हते, त्यामुळे त्यांचे बद्दल विचारले असता ते मिटिंगला गेल्याचे सांगितले त्यामुळे आम्ही परत आलो असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी पंच नं. 1 प्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर पुढिल कार्यवाही 14/00 वाजेच्या सुमारास करण्याचे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 1 यांना तक्रारदार जामदार यांच्या बोलोरो वाहनाने लोकसेवक राऊत यांची भेट घेण्याकरीता सहाय्यक निबंधक कार्यालय कर्जत येथे जाण्याकरीता 14/04 वाजता रवाना केले. त्यानंतर 14/30 वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. 1 आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. पोकाॅ कराड यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. 1 यांना लोकसेवक राऊत यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विषयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे रवाना होउन सहाय्यक निबंधक कार्यालय कर्जत येथे पोहोचलो. मी व तक्रारदार राऊत यांच्या कॅबीन मध्ये गेलो त्यावेळी लोकसेवक राऊत यांनी माझेकडे इशारा करुन तक्रारदार यांना "हयांच काय" असे बोलुन मला बाहेर जाण्याबाबत इशारा केला. मी कॅबीनचे बाहेर येवुन थांबलो'' अशी हकिगत पंच नं. 1 यांनी सांगितली. त्यानंतर तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी पंच नं. 1 प्रमाणे हकिगत सांगुन पंच बाहेर गेल्यानंतर, चर्चे दरम्यान राऊत यांनी "दे देना बाबा" असे म्हणाले त्यानंतर त्यांना "काल दहा हजार दिलेत बरका आजुन पंधरा म्हणताय तुम्ही दहा देतो...... देतो दहा" असे म्हणालो त्यावर श्री. राऊत म्हणाले की, "मला आता कायम, तुला माहितेयेना मला मोबाईल घ्यायचाय, देना मग कधी" असे म्हणाले त्यावर मी त्यांना पंधरा विस

मिनिटात आणुन देतो असे म्हणाले असता त्यांनी "ये पंधरा विस मिनिटांनी, काय लका योगेश आम्ही कधी तरीच तुम्हाला बोलतो मी खंबिर पणे तुमच्या पाठीशी उभा राहतो, मला वाटले योगेश एखादा लाखाचा फोन घेवुन, कसहे की रुईगव्हाणची आठवण म्हणुन सप्रेम भेट", त्यावर मी, त्यांना दहा हजार देतो मी दहा हजार, त्यावर राउत हे म्हणाले की "हे ये पाच हजारासाठी नाराज करतो मला ये" असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच नं. 1 तेथुन निघुन आपण थांबले त्या ठिकाणी परत आलो, अशी हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर मधील तक्रारदार व लोकसेवक राऊत यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, लोकसेवक राऊत यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे विरुध्दचा तक्रारी अर्ज निकाली काढल्याचे मोबदल्यात 10,000/- रूपये लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याचे निष्पन्न झाले.

आम्ही तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळविले असता, त्यांनी त्यांचे बचतीतुन 10,000/- रुपये त्यात 500 रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर को-या कागदावर लिहण्यात आले. तो कागद पंच नं. 2 यांचे कडे देण्यात आला. आम्ही सदर सापळा कारवाईमध्ये ॲन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हा◌ॅयलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोका◌ॅ सुपेकर यांनी करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सदर लाच रक्कम तक्रारदार यांचे शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंचाना व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या. लाच स्विकारले नंतरचा पुर्व नियोजित इशारा ठरवुन दिला. त्यानंतर पोका◌ॅ कराड यांनी व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन ते व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळयात शर्टच्या आत अडकविले. तक्रारदार व पंच नं. 1 यांना लोकसेवक राऊत यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचेकडील बोलोरो वाहनाने 15/01 वाजता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक रवाना होवुन सहाय्यक निबंधक कार्यालयाचे आजुबाजुस सापळा लावुन थांबलो. सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर तक्रारदार व पंच नं. 1 असे वाहनावरून उतरुन पहिल्या मजल्यावरील सहाय्यक निबंधक कार्यालयात गेले. थोडया वेळाने तक्रारदार व पंच नं.1 असे सहाय्यक निबंधक कार्यालयाचे दरवाजाचे बाहेर येवुन त्यांना ठरवुन दिलेला लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इशारा केला ती वेळ 15/49 वा. होती. आमचे सुचनेवरून पोका◌ॅ कराड यांनी तक्रारदार यांचेकडील व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यानंतर आम्ही पंच नं. 1 व तक्रारदार यांना लाच रक्कम कोणी स्विकारली व कोठे ठेवली आहे याबाबत विचारले असता, त्यांनी सहाय्यक निबंधक कार्यालयाचे कॅबिनकडे बोट करुन कॅबिनमधी खुर्चीवर बसलेल्या श्री. राऊत यांचेकडे बोट करुन त्यांनी उजव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवल्याचे सांगुन भेटी दरम्यान त्यांचे सोबत अर्जाबाबत चर्चा झालेनंतर " त्यांनी काय विचार करताय चेहरा का पडला" असे बोलुन पैशाच्या बाबत इशारा केला असता, मी त्यांचे समोर लाचेची रक्कम 10,000/- रुपये धरले व मोजुन घ्या असे म्हणालो असता त्यांनी लाचेची रक्कम स्विकारले बाबत सांगितले.

त्यानंतर आम्ही सापळा पथकाच्या मदतीने कॅबिनमध्ये जावुन श्री. राऊत यांना 16/05 ताब्यात घेतले. राऊत यांना त्यांचे पुर्ण नाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव मिलींद प्रल्हादराव राऊत, वय 50 वर्षे, धंदा नोकरी, पद सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, जि. अहिल्यानगर, हल्ली राह. तांबे यांचे घरात भाडयाने वेदांत हाईटस, भांडेवाडी कर्जत, ता. कर्जत जि. अहिल्यानगर, व फ्लॅट नं. 1802, व्हीटीपी हाईटस, सीएनजी पेट्रोल पंपासमोर, थेरगाव, पुणे असे सांगितले त्यानंतर पंच नं. 2 करवी लोकसेवक राऊत यांचे पॅन्टेच्या उजव्या खिशातुन रक्कम ताब्यात घेण्यात आली त्या नोटा पाहता त्यात 500/-रु. दराच्या 20 चलनी नोटा असे एकुण 10,000/- रुपये मिळुन आले. सदरचे नोंटाचे नंबर हे सापळा पुर्व पंचनाम्याचे वेळी लिहुन घेतलेल्या ना◌ेटांच्या नंबराशी पडताळणी करता ते लोकसेवक राऊत यांचे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशातुन ताब्यात घेण्यात आलेल्या नोंटाच्या नंबराशी तंतोतंत जुळुन आले. सदर कॅबिनचे सर्व लाईट बंद करून आवश्यक तो अंधार करुन त्या अंधारात अल्ट्राव्हायोलेट बॅटरीचे प्रकाशात लाचेच्या नोटा तपासल्या असता सदर नोटांच्या दोन्ही बाजुस ॲन्थ्रासिन पावडरची निळसर पांढरी चकाकी दिसुन आली. त्याच अंधारात अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात लोकसेवक राऊत यांचे हात व कपडे तपासले असता लोकसेवक राऊत यांचे उजव्या हाताच्या बोटांच्या पे-यांना तसेच राऊत यांचे अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशाच्या तोंडास व आतील बाजुस ॲन्थ्रासिन पावडरची निळसर पांढ-या रंगाची चकाकी दिसुन आली. त्याबाबतचे फोटोग्राफस् घेण्यात आले. पुढील कामकाज कर्जत येथे शासकिय विश्रामगृह येथे जावुन करण्याचे सर्वानुमते ठरले. आम्ही तक्रारदार यांना आमचे पाठोपाठ येण्याबाबत सुचना दिल्या. आम्ही विश्रामगृह येथे येवुन एक कक्ष उपलब्ध केला. त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी यशस्वी सापळा कारवाई दरम्यान व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यानंतर पंचनाम्याचे पुढील कामकाज शासकिय विश्रामगृहातील कक्षात करण्यात आले.

तरी दिनांक 10/07/2026 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान 14/04 ते 14/30 वाजेच्या दरम्यान सहाय्यक निबंधक कार्यालय कर्जत येथे लोकसेवक राऊत यांनी तक्रारदार श्री. जामदार यांचेकडे सचिव, रुईगव्हाण विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, मर्या. रुईगव्हाण यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारी अर्जाचे प्रकरण परस्पर निकाली काढल्याच्या मोबदल्यात 25,000/-रुपये पैकी राहिलेल्या 15000/- रुपयांची मागणी करुन, तडजोडी अंती 10,000/- रुपये लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली व लाचेच्या सापळा कारवाई 15/01 ते 15/49 वा. दरम्यान सहाय्यक निबंधक कार्यालय कर्जत येथे लोकसेवक राऊत यांनी तक्रारदार यांचेकडुन 10,000/-रुपये लाचेची रक्कम स्विकारुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणुन यातील लोकसेवक मिलींद प्रल्हादराव राऊत, वय 50 वर्षे, धंदा नोकरी, पद सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, जि. अहिल्यानगर, हल्ली राह. तांबे यांचे घरात भाडयाने वेदांत हाईटस, भांडेवाडी कर्जत, ता. कर्जत जि. अहिल्यानगर, मु.रा.फ्लॅट नं. 1802, व्हीटीपी हाईटस, सीएनजी पेट्रोल पंपासमोर, थेरगाव, पुणे यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष

( अजित त्रिपुटे )
पोलीस उप अधीक्षक

ॲन्टी करप्शन ब्युरो,

अहिल्यानगर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Hanuman Lahanu Gaikwad(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
कर्जत पोलीस स्टेशन
अहिल्यानगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Hanuman Lahanu G:
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**